अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) कंत्राटी ग्रामसेवक
(सध्या पदनाम-ग्रामपंचायत अधिकारी) पदावर
मानधन तत्वावर नियुक्ती देणे बाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-२
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि-२/ग्रापं-१/७६/२०२६
दिनांक:- २७ / ०१ /२०२६

वाचा :- १. शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.एपिटी - १०००/प्रक्र २७२/१३ दि.६ जुन २००१
२. महा.शासन सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबईकडील शासन निर्णय क्र.प्राणिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दि. ०४ मे २०२२
३. महा.शासन ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबईकडील शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०२२/प्र.क्र.११/आस्था ८ दि. १५ मे २०२३
४ जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत गट-क मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात क्रमांक ०१/२०२३
५. महा.शासन सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबईकडील शासन निर्णय क्र.बीसीसी-२०२३/प्र.क्र.५४/आरक्षण ५ दि. ०५ आक्टोबर २०२४
६. मा.उपसचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्र.पदभ-२०२४/प्र.क्र.२८५/आस्था ८, दि. ०५ आक्टोबर २०२४
७. सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.बीसीसी २०२३/प्र.क्र.५४/आरक्षण ५ दि.०५/०१/२०२५
८. जिल्हा निवड समिती अहिल्यानगर यांचेकडील निवडयादी दि.२८/०२/२०२५.
९. या कार्यालयाकडील आदेश क्र.साप्रवि २/ग्राप १/८७८/२०२४ दि.०८/१०/२०२४

-: आदेश :-

जिल्हा निवड समिती/जिल्हा परिषद निवड समिती अहिल्यानगर यांचेकडून शिफारस केलेल्या खालील उमेदवारांची जिल्हा सेवा (गट-क) मानधन तत्वावर कंत्राटी ग्रामसेवक (सध्या पदनाम - ग्रामपंचायत अधिकारी) या पदावर मासिक मानधन रुपये १६०००/- आणि नियमित ग्रामपंचायत अधिकारी यांचेप्रमाणे प्रवासभत्ता याप्रमाणे त्यांचे नावासमोर नमुद केलेल्या ठिकाणी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन मानधन तत्वावर दि.०९/०९/२०२५ ते दि ०८/०९/२०२६ या कालावधीत ११ महिन्यांसाठी विशेष बाब म्हणुन नियुक्ती करणेत येत आहे.

| अ.क्र | उमेदवाराचे नांव व पत्ता | निवडीचा प्रवर्ग | नियुक्ती व पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | श्रीम.अश्विनी निंबा डगळे,<br>सूर्योदय कॉलनी, मु.पो. राजुर, ता-अकोले, जि.-अहिल्यानगर ४२२६०४ | अनुसूचित जमाती (पेसा) | पंचायत समिति, अकोले (अनुसूचित क्षेत्र) |

नेमणूकीच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे :-

१. मानधन तत्वावर दिलेली नेमणुक ही मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल असलेल्या विशेष अनुज्ञा याचिका २२१०९/२०२३ च्या अंतीम निर्णयाच्या अधीन राहुन करण्यात येत आहे.
२. सदरची मानधन तत्वावर दिलेली नेमणुक ही पुढील आदेशापर्यंत अथवा शासन निर्देशापर्यंत अथवा मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल विशेष अनुज्ञा याचिका २२१०९/२०२३ संदर्भातील निकालाच्या अधीन राहून येणा-या शासन आदेशापर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यत वैध राहील.
३. कंत्राटी ग्रामसेवक (सध्या पदनाम-ग्रामपंचायत अधिकारी) या पदावर मानधन तत्वावर केलेली नियुक्ती केव्हाही कोणत्याही प्रकारची आगाऊ नोटीस न देता संपुष्टात आणणेत येईल.
४. विशेष बाब म्हणुन मानधन तत्वावर नियुक्ती असुन सदरची रक्कम ही नियमित वेतन नसून मासिक मानधन आहे.

५. कंत्राटी ग्रामसेवक (सध्या पदनाम-ग्रामपंचायत अधिकारी) या पदावर नियुक्ती देतांना, आपण सादर केलेली कागदपत्रे व प्रमाणपत्रे, माहिती खोटी आढळल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता आपली नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल तसेच नियमाप्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

६. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, शासन परिपत्रक, शासन पत्र आपणावर बंधनकारक राहील.

७. मानधनतत्वावर नियुक्ती कालावधीत आपणास एकुण १२ किरकोळ रजा अनुज्ञेय राहतील. (एकुण देय रजेपेक्षा जास्त रजा या विनावेतन असतील)

८. आपणास ज्या ग्रामपंचायतीचा कार्यभार दिलेला आहे, त्या ग्रामपंचायतीचा कार्यभार नियमानुसार सांभाळणे आपणावर बंधनकारक राहील या आशयाचे बंधपत्र गटविकास अधिकारी पंचायत समिती कार्यालय यांचेकडे रुजु होताना देणे आवश्यक आहे.

९. मानधन तत्वावर नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवाराची शारिरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम नसल्याचे व प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता नसलेचे निदर्शनात आल्यास त्यांची सेवा कोणत्याही स्वरुपाची पुर्व सुचना अथवा नोटीस न देता सेवा समाप्त करण्यात येईल.

१०. कंत्राटी ग्रामसेवक (सध्या पदनाम-ग्रामपंचायत अधिकारी) हे पद कार्यकारी स्वरुपाचे असल्याने नियुक्तीपूर्वी सुरक्षा ठेव म्हणून रु.१०,०००/-एवढी रक्कम नियुक्ती प्राधिका-याकडे भरावी, तसेच दोन प्रतिष्ठित व्यक्तींचे जामिनपत्र लिहून द्यावे.

११. उमेदवाराने खाली दिलेल्या नमुन्यात प्रतिज्ञापत्र भरुन ज्या कार्यालयात नेमणुक करणेत आलेली आहे त्यासंबंधीत गटविकास अधिकाऱ्याकडे सादर करावे.

प्रतिज्ञापत्राचा नमुना- मी, श्री/श्रीम ............................रा............ प्रतिज्ञापत्र लिहून देतो की, जिल्हा परिषद अहिल्यानगर सेवेत माझी नियुक्ती मानधन तत्वावर झाली असून ती कोणतेही कारण अथवा नोटीस न देता संपविण्याचा जिल्हा परिषद अहिल्यानगर ला पुर्ण अधिकार आहे. या बाबत मला पुर्ण कल्पना व माहिती असून मी मानधन तत्वावर कंत्राटी ग्रामसेवक (सध्या पदनाम-ग्रामपंचायत अधिकारी) ही नेमणुक स्वीकारत आहे.

१२. मानधन तत्वावर कंत्राटी ग्रामसेवक (सध्या पदनाम-ग्रामपंचायत अधिकारी) पदाच्या नेमणुकीचे आदेश मिळालेपासून ३० दिवसांचे आत नेमणुकीचे ठिकाणी रुजू व्हावे लागेल. नेमणुकीचे ठिकाणी मुदतीत रुजु न झाल्यास नेमणूक आदेश रद्द केला जाईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरचा आदेश हा अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक 202601270600036 असा आहे.

(आनंद भंडारी,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
श्रीम.अश्विनी निंबा डगळे,
द्वारा व प्रत गटविकास अधिकारी, पंचायत समिती अकोले

२/- संबधित नियुक्त उमेदवारास नियमानुसार व वरील अटी शर्तीच्या अधीन राहून पंचायत समिती कार्यालयात हजर करुन घ्यावे. तसेच सदर उमेदवाराचा ११ महिन्याचा कालावधी समाप्त होण्याच्या दिनांकास आपले स्तरावरून सेवामुक्त करावे. सेवा कालावधी संपण्याच्या ३० दिवस अगोदर सदर उमेदवाराचा कार्यमूल्यमापन अहवाल व पुढील नियुक्ती आदेश होणेबाबत प्रस्ताव या कार्यालयास न चुकता सादर करावा. सदर बाबत हलगर्जीपणा झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची गांभीयाने नोंद घ्यावी.

प्रत कार्यवाहीसाठी:-

१.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), जिल्हा परिषद अहिल्यानगर

२.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर

स्वाक्षरीत/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर